स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गट क या संवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ अभियंता गट क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर.
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.बांध/आस्था-२/ ३९४ /२०२५
अहिल्यानगर दिनांक. २३/०६/२०२५

वाचा :- १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ६ नियम ५
२) ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.०२ फेब्रुवारी,२००६
३) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२अे/१६-ब दि.२९/१२/२०१७
४) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२ दि.०१/०८/२०१९
५) पदोन्नती निवड समितीचे मंजुर इतिवृत्त दिनांक ०९/१२/२०२४.

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (दुय्यम अभियांत्रिकी) द्वितीय श्रेणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कनिष्ठ अभियंता गट-क या पदावर वेतनबॅन्ड एस-१४ - ३८६०० -१२२८०० अधिक प्रचलित दराने मिळणारे भत्ते मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीच्या अधिन राहून रकाना क्र.५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नती दिलेली पदस्थापना ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयांच्या अधिन राहुन खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याने तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तदर्थ पदोन्नतीने भरणेत येत आहे.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे पदनाम व कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने नियुक्तीचे पदनाम व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.एस.एच.खेडकर | जि.प.सा.बां. उपविभाग शेवगांव | ज्येष्ठतेनुसार (व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण होणेपासून सुट दिलेली असल्याने) | कनिष्ठ अभियंता - जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी |

**अटी व शर्ती -**

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात देणेत येत आहे.
२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.
३. शासन निर्णय दि.०१/०४/२०१०, दि.०२/०३/२०१९ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ (पदोन्नतीच्या पदाचा) मंजूर केलेल्या कर्मचा-यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.
४. नेमणूकीच्या ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने ०७ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवा ज्येष्ठता डावलली जाईल. तसेच सदरची पदोन्नती स्विकारत/नाकारत असलेबाबतचे लेखी पत्र संबधिताने त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत सात दिवसांत जि.प.सा.बा.उत्तर विभाग अहमदनगर येथे सादर करावे.

६. श्री.खेडकर यांनी बांधकाम विभागाचा विकल्प दिल्यामुळे त्यांची नियुक्ती बांधकाम विभागांतर्गत केली आहे. व कायम स्वरुपी बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षाखाली वेतन व भत्ते अदा करावे. शासन निर्णय दि.२१/१०/२०११ नुसार त्यांच्या नावाचा समावेश सेवा जेष्ठता यादीत करावा.

७. श्री.खेडकर यांची कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती झाली असल्याने त्यांना बांधकाम विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी त्यांचे पदोन्नतीच्या कोट्यातील मंजूर पदानुसार विहित बिंदू क्रमांकावर दर्शवावे.

८. सदरचे आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 2024०६2393००3८ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-06-2025 22:45:42

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**श्री.एस.एच.खेडकर, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**
**द्वारा उप अभियंता,जि.प.सा.बां.उपविभाग शेवगांव**

**प्रत :- माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.**

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर
२) कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बां.उत्तर विभाग/ दक्षिण विभाग अहमदनगर
३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.अहमदनगर
४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती **शेवगांव/पाथर्डी.**
५) उप अभियंता,जि.प.सा.बां.उपविभाग-**पाथर्डी**
६) उप अभियंता,जि.प.सा.बां.उपविभाग-**शेवगांव**

**२/- उपरोक्त पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास पदोन्नतीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

सही/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर